**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**
web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/ ११२५१ दि. २०/०९/२०१७

## परिपत्रक

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणे बाबत..**

संदर्भ :- शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७

सन २०१७-१८ पासून संदर्भिय शासननिर्णयातील परिशिष्ट - अ मध्ये नमुद असलेल्या उच्च शिक्षण संचालनालय व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची MahaDBT Portal द्वारे ऑनलाईन अंमलबजावणी करण्यात येत आहे.

संदर्भिय शासन निर्णयात नमुद परिशिष्ट - (अ) मधील योजना खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| ०१ | हिंदी मधील मॅट्रीकोत्तर अभ्यासासाठी अहिंदी भाषीक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ०२ | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| ०३ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| ०४ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| ०५ | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| ०६ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (AMS) |
| ०७ | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| ०८ | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| ०९ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| १० | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

- सन २०१७-१८ पासून वरील सर्व शिष्यवृत्ती व सवलती योजनांचे नवीन मंजरी व नुतनीकरणाच्या ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी राज्यशासनामार्फत MahaDBT Portal सुरु करण्यात आलेले आहे.
- सदर शिष्यवृत्ती / सवलती योजनांचे नविन मंजूरी / नुतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांनी www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील. सदर माहिती MahaDBT Portal वर उपलब्ध आहे.

Scanned by CamScanner

- नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी मागील वर्षाचा मंजूरी आदेश क्रमांक असणे आवश्यक आहे. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना मंजूरी आदेश क्रमांक देण्यात यावा. गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य (AMS) योजनेसाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या प्रथम पत्राची प्रत स्कॅन करुन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.

- विद्यार्थ्यांनी उपरोक्त शिष्यवृत्ती / सवलतींचे ऑफलाईन पध्दतीने अर्ज करून नयेत. तथापि यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज उच्च शिक्षण संचालनालय अथवा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर केलेले असतील त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालय / विद्यापीठांनी संबंधित विद्यार्थ्यांना सूचना देऊन ऑनलाईन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज न भरल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

- महाविद्यालय / विद्यापीठ स्तरांवर अर्जाची छाननी करण्यासाठी आवश्यक असलेले महाविद्यालयातील प्राचार्य व लिपीक यांचेसाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून देण्यात आलेले युजर आय.डी. व पासवर्ड संबंधित महाविद्यालयांना तात्काळ देण्याची जबाबदारी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची राहील. तसेच ज्या महाविद्यालयाचे नाव / कोर्सचे नाव MahaDBT Portal वर दिसून येत नाही अशा महाविद्यालयांची विहीत विवरणपत्रातील आवश्यक माहिती (English Excel Format) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी उच्चशिक्षण संचालनालयास तात्काळ देण्यात यावी.

- संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर याबाबत वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण तसेच महाविद्यालय / विद्यापीठ यांनी वेळोवेळी अवलोकन करावे.

- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ यांनी छाननी करुन त्वरीत पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत.

- विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना येणाऱ्या / महाविद्यालय / विद्यापीठ यांना अर्जावर पुढील कार्यवाही करताना येणाऱ्या तांत्रिक समस्यासाठी MahaDBT Portal वर देण्यात आलेले टोल फ्री क्रमांक व ई-मेल आय.डी. यावर संपर्क साधावा.

- सर्व विभागीय सहसंचालक यांनी त्यांच्या अधिनस्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये, विद्यापीठे यांना उपरोक्त सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात याव्यात. तसेच सदर योजना MahaDBT Portal द्वारे प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यशाळा, बैठका आयोजीत करुन महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत,

माहिती व पुढील कार्यवाहीस्तव

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१
६. संचालक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१

Scanned by CamScanner

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं/शिष्य-२०१७/डीबीटी पोर्टल/ ११२५४ दि. २०/०९/२०१७

**परिपत्रक**

**विषयः- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनांची राज्यशासनाच्या MahaDBT Portal द्वारे अंमलबजावणी करणे बाबत..**
**गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (AMS)**

संदर्भ :- शासन निर्णय क्र. स्कॉलर-४९१७/प्र.क्र.१४६/मशि-२, दि. ०२/०८/२०१७

सन २०१७-१८ पासून संदर्भिय शासन निर्णयानुसार उच्च शिक्षण संचालनालया मार्फत राबविण्यात येणारी गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य या शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांचे नविन मंजूरी / नुतनीकरणाचे अर्ज MahaDBT Portal द्वारे www.mahadbt.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या वतीने गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना ही आठ विभागीय परीक्षा मंडळातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांमध्ये गुणवत्ता यादीत वरचा क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी शा.नि.दि. १७ मे, १९८४ नुसार राबविण्यात येते. अशा विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळ, पुणे यांच्याकडून प्राप्त करुन सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असेल त्यानुसार अर्थिक सहाय्य (प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क ,प्रयोग शुल्क जिमखाना शुल्क, सत्र शुल्क ,परीक्षा शुल्क ,वसतिगृह शुल्क, भोजन शुल्क, पुस्तके व इतर साहित्य वैद्यकिय शुल्क इत्यादी.) अदा करण्यात येते.

माध्यमिक शालांत व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा गुणवत्ता यादीमध्ये उच्च स्थान प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासनाने खालील प्रमाणे संच तयार केलेले आहेत.

**माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ. १० वी )**

१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधुन प्रथम पाच गुणवत्ताधारक विद्यार्थी/ विद्यार्थीनी
२. गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली ( वरील पाच गुणवत्ता धारका व्यतिरिक्त )
३. गुणवत्तेनुसार मागसवर्गीयामधून पहिले तीन विद्यार्थी / विद्यार्थीनी ( वरील अ व ब गुणवत्ताधारक व्यतिरिक्त) असे एकुण ८८ संच आहेत.

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा ( इ. १२ वी)**

१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधुन प्रथम पाच गुणवत्ताधारक विद्यार्थी/ विद्यार्थीनी
२. गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली ( वरील पाच गुणवत्ता धारका व्यतिरिक्त )
३. गुणवत्तेनुसार मागसवर्गीयामधून पहिले दोन विद्यार्थी/ विद्यार्थीनी (वरील अ व ब गुणवत्ताधारक व्यतिरिक्त)
४. विज्ञान विद्याशाखेतील पाहिले दोन विद्यार्थी
५. कला विद्याशाखेतील पाहिले दोन विद्यार्थी
६ वाणिज्य विद्याशाखेतील पाहिले दोन विद्यार्थी असे एकुण १२० संच मंजूर आहेत.

शिष्यवृत्ती / आर्थिक सहाय्य योजनेच्या लाभासाठी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली कार्यपध्दती, अटी, शर्ती व निकष लागू राहतील. सदर माहिती MahaDBT Portal वर उपलब्ध आहे.

Scanned by CamScanner

**शिष्यवृत्ती नवीन मंजूरी**

१. संचालनालयामार्फत शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांस घरच्या पत्त्यावर पत्र पाठविण्यात येते. सदर पत्राची छायांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.
२. अर्जासोबत चालू वर्षाची फी भरल्याची पावती, हॉस्टेल असल्यास त्याची फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे नुतनीकरण**

१. नुतनीकरणाचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या प्रथम पत्राची प्रत स्कॅन करुन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक आहे.
२. कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ५५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
३. वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना मागील वर्षात ६५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
४. अर्जासोबत चालू वर्षाची फी भरल्याची पावती, हॉस्टेल असल्यास त्याची फी भरल्याची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

सन २०१७-१८ साठी विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने करु नयेत. तथापि यापूर्वी सन २०१७-१८ साठी ज्या महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज उच्च शिक्षण संचालनालयाकडे सादर केलेले असतील त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. तरी महाविद्यालय / विद्यापीठांनी संबंधित विद्यार्थ्यांना सूचना देऊन ऑनलाईन अर्ज भरणेबाबत कळविण्यात यावे. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज न भरल्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

सदर शिष्यवृत्तीच्या अद्ययावत माहितीसाठी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करावे.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेले अर्ज महाविद्यालय / विद्यापीठ यांनी छाननी करुन त्वरीत पुढील टप्प्यावर ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत.

विद्यार्थ्यांना अर्ज भरतांना येणाऱ्या तसेच महाविद्यालय / विद्यापीठ यांना अर्जावर पुढील कार्यवाही करताना येणाऱ्या तांत्रिक समस्यासाठी MahaDBT Portal वर देण्यात आलेले टोल फ्री क्रमांक व ई-मेल आय.डी. यावर संपर्क साधावा.

आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना उपरोक्त सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात याव्यात. तसेच सदर योजना MahaDBT Portal द्वारे प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यशाळा, बैठका आयोजीत करुन महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उच्च शिक्षण संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रती,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१
६. संचालक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग

Scanned by CamScanner

| उच्च शिक्षण संचालनालया मार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती / सवलतींचा तपशिल | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **विषय** | **शासन निर्णय क्रमां क व दिनांक** | **तपशिल** |
| **राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजना** | | | |
| १ | अहिंदी भाषिक राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती | क्र.एफ.१५-१/२००४/एन.एस. १, दि. २७/०४/२००४ | मंजुर संच २५५<br>१. विद्यार्थ्याची मातृभाषा हिंदी नसावी.<br>२. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक<br>३. नवीन मंजूरीसाठी १० वी व १२ वी मध्ये ६० टक्के गुण आवश्यक व हिंदी विषयात ६५ टक्के गुण आवश्यक<br>४. नुतनीकरणासाठी मागील वर्षात ५० टक्के गुण आवश्यक<br>५) विद्यार्थ्यांने पुढील शिक्षणासाठी हिंदी विषय घेणे आवश्यक |
| २ | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना | क्र.एससीएच-१०९५/(८१) मशि-४, दि.७.२.१९९६ | या योजनेअंतर्गत होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>१. विधी, वाणिज्य व कला शाखेमध्ये पदवीसाठी किमान ६० टक्के व विज्ञान शाखेसाठी ७० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२. नुतनीकरणासाठी ५० टक्के गुण आवश्यक<br>३. पालकांची उत्पन्न मर्यादा रु. ७५०००/- पर्यत असणे आवश्यक<br>४. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>५. संबंधीत लाभार्थी कुठेही पूर्ण किंवा अर्धवेळ नोकरी करणारा नसावा.<br>पात्र विद्यार्थ्यांना नवीन मंजुरकरिता प्रथमवर्षी रु .५०००/- व नुतनीकरणासाठी दूसया वर्षी रु.५०००/- अशा प्रकारे रक्कम विद्यार्थ्यांना मंजुर केली जाते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना | शिक्षण व सेवायोजन विभाग, एएफईडी १०८३/१८१६३५(२३१७) साशि-५, दि. १७.०५.१९८४ | मंजूर संच २०८<br>१. राज्यशासनाची माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेत वरचा क्रमांक मिळविणाया गुणवान विद्यार्थ्यांसाठी<br>२. नुतनीकरणासाठी कनिष्ठ स्तरांवर किमान ५५ टक्के व वरिष्ठ स्तरांवर किमान ६५ टक्के गुण आवश्यक<br>३. विविध शुल्काची प्रतिपूर्ती शासनाने मान्य केलेल्या दरानुसार केली जाईल.<br>४. इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / सवलतीचा लाभ घेता येणार नाही.<br>५. पात्र विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य मंजूरीबाबतचे पत्र उच्च शिक्षण संचालनालयाकडून पाठविण्यात येते. |
| ४ | राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१०६३-यु, दि. १६.११.१९६४ शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - १२०८<br>१. कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणाया विद्यार्थ्यांस इ. १२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| ५ | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५७२-एस. दि.१४.०५.१९७१शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - ८० (शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव, अमरावती, औरंगाबाद,धुळे करिता प्रत्येकी २० प्रमाणे)<br>१. राज्यातील शासकीय विद्यानिकेतन मधून इ. १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीसाठी शालांत प्रमाणपत्र परिक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>३. अर्जासोबत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र व शासकीय विद्यानिकेतन द्वारे प्राप्त इन्टायलमेंट कार्ड, १० वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची प्रत आवश्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना | शिक्षण व समाजकल्याण विभाग, एससीएच/१४७०/१०७५-७२/एस. दि.१४.०५.१९७१ शासन निर्णय दि. ५/०२/२००४ नुसार सुधारीत दर रु. १००/- दरमहा | मंजूर संच - १०० (गणित ५० व भौतिक ५०)<br>१. विज्ञान शाखेच्या पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले व गणित किंवा भौतिक शास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>२. नवीन मंजूरीचा अर्ज करणाया विद्यार्थ्यांस इ. १२ वी च्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक |
| ७ | राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती | शिक्षण व समाजकल्याण विभाग शासन निर्णय एससीएच/१०६५-यु. दि.१९.०९.१९६५ | मंजूर संच - ७६<br>१. राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सदर शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२.शासकीय विज्ञान संस्था / महाविद्यालये तसेच विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या आवेदनपत्रानुसार मंजूर संचाच्या प्रमाणात शिष्यवृत्ती देण्यात येते.<br>३. विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमांतील समाधानकारक प्रगती अहवालानुसार |
| ८ | शासकीय अधिसंशोधन अधिछात्रवृत्ती | शिक्षण व सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र.एससीएच/१०८२/४१९९ विशि-३, दि.१३.०८.१९८५ | मंजूर संच - १४<br>१. राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरांवरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पीएचडी करता यावी यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.<br>२. सदर शिष्यवृत्तीसाठी राज्यस्तरांवरील ३ व महाविद्यालयासाठी ११ संच<br>३. शिक्षण संचालनालयाच्या स्तरांवर गठीत केलेल्या समिती मार्फत प्राप्त आवेदन पत्रांची छाननी करुन राज्यस्तरांवरील ३ संचाची निवड केली जाते.<br>४. महाविद्यालयीन स्तरांवर प्राचार्यांनी गठीत केलेल्या समितीकडून ११ संचाची निवड केली जाते.<br>५. संबंधीत विद्यार्थ्यांने पीएचडी संबंधी विद्यापीठाकडे नोंदणी करुन संबंधीत मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.<br>६. संबंधीत छात्र कोठेही सेवेत नसावा तसेच त्याने इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेतलेली नसावी.<br>७. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती | एससीएच/१०८२/१५११६०/२१७३/जनरल-५, दि.०७.०५.१९८३ | मंजूर संच - ०१<br>जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडून विहीत नियमानुसार निवड करुन त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रीयीन विद्यार्थ्यांमधून एका विद्यार्थ्यांची निवड केली जाते. |
| **सवलत योजना** | | | |
| १० | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | शिक्षण व सेवायोजन विभाग शानि.क्र. एमआयएस १४६५/एच, दि. २३/११/१९६५ | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना सर्व स्तरांवर शैक्षणिक सवलत देण्यात येते. |
| ११ | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य | एनडीएफ/१०७९/२२२९२०/(५३७) साशि दि.१४/१/१९८५ | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र दाखल केलेल्या मेजर, नौदल, वायूदल दर्जाच्या किंवा त्यापेक्षा कमी हुद्याच्या माजी सैनिकांना शैक्षणिक सवलती दिल्या जातात. |